सेवा प्रवेश नियम
ले.अ

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग,
मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२,
दिनांक :- १३ सप्टेंबर, २०१२

भारताचे संविधान

## अधिसूचना

क्रमांक सेप्रनि १०.०७/प्र.क्र.१६०/कोषागार (प्रशा-२), भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, आणि याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख यांचे अधिक्रमण करुन महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाखालील लेखा व कोषागारे संचालनालयातील लेखा व कोषागारे संचालक, सह संचालक, उप संचालक, सहायक संचालक आणि लेखाधिकारी गट-ब(राजपत्रित) या पदांवरील सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :-

१. या नियमांस, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा (संचालक, सह संचालक, उप संचालक, सहायक संचालक आणि लेखाधिकारी (सेवाप्रवेश) नियम २०१२ असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, अन्यथा दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(क) "आयोग" याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, असा आहे.

(ख) "पदवी " याचा अर्थ, सांविधिक विद्यापीठाची पदवी, असा आहे.

(ग) "वित्त विभाग " याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा वित्त विभाग, असा आहे.

(घ) "महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा" याचा अर्थ, संचालक, सह संचालक, उप संचालक, सहायक संचालक आणि लेखाअधिकारी तसेच ज्या पदांवर हे अधिकारी प्रतिनियुक्त केले जातात अशी समतुल्य वेतनश्रेणी असलेली इतर सर्व पदे असा असून त्यामध्ये यांचा समावेश होतो ;

(ड.) "संचालक" याचा अर्थ, लेखा व कोषागारे संचालक, महाराष्ट्र शासन ही पदे आणि ज्या पदांवर "महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा" यांचे अधिकारी प्रतिनियुक्त/ पदस्थापित केले जातात अशी समतुल्य वेतनश्रेणी असलेली इतर पदे असा असून, त्यामध्ये यांचा समावेश होतो ;

(च) "सह संचालक" याचा अर्थ, सह संचालक, लेखा व कोषागारे ही पदे आणि ज्या पदांवर "महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा" यांचे अधिकारी प्रतिनियुक्त/ पदस्थापित केले जातात अशी समतुल्य वेतनश्रेणी असलेली इतर पदे असा असून त्यामध्ये यांचा समावेश होतो ;

(छ) "उप संचालक" याचा अर्थ, उप संचालक, लेखा व कोषागारे ही पदे आणि ज्या पदांवर "महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा" यांचे अधिकारी प्रतिनियुक्त/ पदस्थापित केले जातात अशी समतुल्य वेतनश्रेणी असलेली इतर पदे असा असून त्यामध्ये यांचा समावेश होतो ;

(ज) "सहायक संचालक" याचा अर्थ, सहायक संचालक, लेखा व कोषागारे ही पदे आणि ज्या पदांवर "महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा" यांचे अधिकारी प्रतिनियुक्त/ पदस्थापित केले जातात अशी समतुल्य वेतनश्रेणी असलेली इतर पदे असा असून त्यामध्ये यांचा समावेश होतो ;

(झ) "लेखा अधिकारी" याचा अर्थ, लेखा अधिकारी, लेखा व कोषागारे ही पदे आणि "महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा" यांचे अधिकारी प्रतिनियुक्त/ पदस्थापित केले जातात अशी समतुल्य वेतनश्रेणी असलेली इतर पदे असा असून त्यामध्ये यांचा समावेश होतो ;

(ञ) "संचालनालय" याचा अर्थ, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र शासन, असा आहे.

(ट) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे.

(ठ) "मान्यता प्राप्त संस्था" याचा अर्थ, कोणत्याही राज्य अथवा केंद्र शासनाकडून मान्यता मिळालेली संस्था, असा आहे.

(ड) "सचिवालयीन विभाग" याचा अर्थ, विधी व न्याय विभागाचा विधी उपविभाग वगळता, शासनाचा कोणताही विभाग, असा आहे.

३. "महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा" यामधील संचालक या पदावरील नियुक्ती ही, "महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा" यामध्ये ज्या व्यक्ती सह संचालक हे पद धारण करीत आहेत आणि ज्यांना त्या पदावरील नियमित सेवेतील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतका अनुभव आहे, तसेच ज्यांनी शासनाने विहित केलेली महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा (अधिकारी) वर्ग १ परीक्षेचे भाग एक / दोन उत्तीर्ण केले आहेत अथवा सदर परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून ज्यांना सूट मिळाली आहे अशा व्यक्तींमधून, ज्येष्ठतेचा योग्य विचार करुन काटेकोर निवडीच्या आधारे योग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन करण्यात येईल.

सह संचालक

४. "महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा" यामधील सह संचालक या पदावरील नियुक्ती ही, "महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा" यामध्ये ज्या व्यक्ती उप संचालक हे पद धारण करीत आहेत आणि ज्यांना त्या पदावरील नियमित सेवेतील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतका अनुभव आहे, तसेच ज्यांनी शासनाने विहित केलेली महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा (अधिकारी) वर्ग १ परीक्षा भाग एक व दोन उत्तीर्ण केले आहेत अथवा सदर परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळालेली असेल अशा व्यक्तींमधून, ज्येष्ठतेचा योग्य विचार करुन काटेकोर निवडीच्या आधारे योग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन करण्यात येईल.

उप संचालक

५. "महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा" यामधील उप संचालक या पदावरील नियुक्ती ही, "महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा" यामध्ये ज्या व्यक्ती सहायक संचालक हे पद धारण करीत आहेत आणि ज्यांना त्या पदावरील नियमित सेवेतील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतका अनुभव आहे, तसेच ज्यांनी शासनाने विहित केलेली महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा (अधिकारी) वर्ग १ परीक्षा भाग एक व दोन उत्तीर्ण केले आहेत अथवा सदर परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळालेली आहे अशा व्यक्तींमधून, ज्येष्ठतेचा योग्य विचार करुन काटेकोर निवडीच्या आधारे योग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन करण्यात येईल.

हाय्यक संचालक ६. "महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा" यामधील सहायक संचालक या पदावरील नियुक्ती एकतर,-

(क) "महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा" यामध्ये ज्या व्यक्ती लेखा अधिकारी हे पद धारण करीत आहेत आणि ज्यांना त्या पदावरील नियमित सेवेतील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतका अनुभव आहे,

ंचालक

तसेच ज्यांनी महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा (अधिकारी) परीक्षा भाग एक व दोन उत्तीर्ण केले आहेत अशा व्यक्तींमधून, योग्यतेच्या अधीनतेने ज्येष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन करण्यात येईल.

किंवा

(ख) जे उमेदवार, --

(एक) ३३ वर्षांपेक्षा अधिक वयाचे नाहीत व

(दोन) पुढीलपैकी कोणतीही अर्हता धारण करीत आहेत , --

(क) सांविधिक विद्यापीठाची, किमान ५५ टक्क्यांसह वाणिज्य शाखेची स्नातक पदवी, किंवा

(ख) इन्स्टिटयुट ऑफ चार्टर्ड अकाऊंट्स ऑफ इंडीया यांनी घेतलेल्या सनदी लेखापालाची अंतिम परिक्षा उत्तीण केली असेल किंवा

(ग) इन्स्टिटयुट ऑफ कॉस्ट अँड वर्क्स अकाऊंट्स यांनी आयोजीत केलेली परिव्यय लेखाशास्त्रातील अंतीम परीक्षा उत्तीर्ण आहेत, किंवा

(घ) सांविधिक विद्यापीठाची वाणिज्य मधील पदव्युत्तर पदवी ; किंवा

(ड) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यताप्राप्त संस्थेमधून वित्त व्यवसाय प्रशासन या विशेषज्ञतेसह पदव्युत्तर पदवी (एम.बी.ए.)

अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल.

लेखा अधिकारी ७. शासनाकडून महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखा अधिकारी या पदावरील नियुक्ती, एकतर --

(क) महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (अराजपत्रित) हे पद धारण करणा-या व त्या पदावर किमान तीन वर्षांची नियमित सेवा झालेल्या आणि ज्याने त्या पदासाठी विहित केलेली अर्हताकारी परीक्षा उत्तीर्ण केलेली असेल अशा व्यक्तींमधून, जेष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने

किंवा

(ख) (एक) ज्याचे वय ३३ वर्षांपेक्षा अधिक नसेल व

(दोन) ज्याने खालीलपैकी कोणतीही अर्हता धारण केली असेल , --

(क) सांविधिक विद्यापीठाची, किमान ५५ टक्क्यांच्या गुणांसह वाणिज्य शाखेतील स्नातक पदवी, किंवा

(ख) इन्स्टिटयुट ऑफ कॉस्ट अँड वर्क्स अकाऊंट्स यांनी घेतलेल्या सनदी लेखापालाची अंतिम परिक्षा उत्तीर्ण केले असेल किंवा

(ग) इन्स्टिट्युट ऑफ कॉस्ट ॲन्ड वर्कस अकाऊंटस् ऑफ इंडिया यांनी घेतलेल्या परिव्यय लेखाशास्त्राची अंतीम परीक्षा उत्तीर्ण केली असेल, किंवा

(घ) सांविधिक विद्यापीठाची वाणिज्य शाखेतील पदव्युत्तर पदवी, किंवा

(ड.) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने मान्यता दिलेली वित्त मधील व्यवसाय प्रशासन पदव्युत्तर पदवी (एम.बी.ए.)

अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाने,

किंवा

(ग) ज्याची जिल्हा परिषदांच्या जिल्हा तंत्र सेवा वर्ग-तीन (गट-क) (लेखा) या संवर्गात ३ वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी सेवा झाली असेल अशा संवर्गातील व ज्याने त्या पदासाठी विहित केलेली अर्हताकारी परीक्षा उत्तीर्ण केली असेल अशा योग्य उमेदवारांमधून निवड करुन, करण्यात येईल.

८. नियम ६ मध्ये नमूद केलेल्या पदासाठी पदोन्नतीने व नामनिर्देशनाने त्या पदावर नियुक्ती करण्याचे प्रमाण ५०:५० असेल आणि नियम ७ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने, नामनिर्देशनाने व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांमधून निवडीने नियुक्ती करण्याचे प्रमाण ६५:२०:१५ असे असेल.

९. नियम ६ व ७ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त झालेली व्यक्ती, दोन वर्षांच्या कालावधीसाठी परिविक्षाधीन असेल. परिविक्षाधीन कालावधी एका वर्षापर्यंत वाढविता येईल. नियुक्त झालेल्या व्यक्तीला विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्याची व परिविक्षाधीन कालावधी यशस्वीपणे पूर्ण करण्याची आवश्यकता असेल. जर तो/ती विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाला/झाली नसेल किंवा त्याने/तिने परिविक्षाधीन कालावधी यशस्वीपणे पूर्ण केला नसेल किंवा तो/ती परिविक्षाधीन कालावधीत त्या पदासाठी योग्य नसल्याचे आढळून आले असेल तर तो/ती, सेवा समाप्त करण्यासाठी पात्र असेल.

१०. नियम ६ व ७ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्ती झालेली व्यक्ती, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमांना अनुसरुन महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा (अधिकारी) परीक्षा (म्हणजे भाग एक व दोन) म्हणून ओळखली जाणारी विहित विभागीय परीक्षा यापुर्वीच उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला अशी परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट मिळाली नसेल तर तिला ही परीक्षा उत्तीर्ण होण्याची आवश्यकता असेल.

११. नियम ३,४,५,६ व ७ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीला, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमांना अनुसरुन तो/ती यापुर्वीच हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा त्याला / तिला या परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.

१२. नियम ३,४,५,६ व ७ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, माहिती व

तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी विहित केलेले संगणक परिचालन प्रमाणपत्र धारण केले पाहिजे.

१३. नियम ६ च्या खंड (ब) उप खंड (दोन) मध्ये आणि नियम ७ च्या खंड (ब) उप खंड (दोन) मध्ये काही अंतर्भूत असले तरी, निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर, अनुसुचीत जातीच्या, बौध्द धर्मामध्ये धर्मांतरित झालेल्या अनुसुचीत जातीच्या, अनुसुचित जमातीच्या उमेदवारांसाठी राखीव असलेली रिक्त पदे भरण्याकरिता आवश्यक असलेली उच्चतर मूळ शैक्षणिक अर्हता/अनुभव धारण करणारे उमेदवार पुरेशा संख्येने उपलब्ध नाहीत असे आयोगाचे मत असेल तर, आयोगाला, अशा निवडीच्या बाबतीत, पदविधारकांच्या गुणांची अट ५० टक्क्यापर्यंत शिथिल करता येईल.

१४. नियम ३,४,५,६ व ७ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदलीसाठी पात्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(श्रीकांत देशपांडे)

शासनाचे सचिव,वित्त विभाग